I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** सांगोला **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0210 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2026 05:23 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 05/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 05/03/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 13:41 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:02 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 06/03/2026 **Time (वेळ):** 04:37 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2026 04:37 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 14 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** संगेवाडी मंडल अधिकारी कार्यालय,सांगोला

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| **S. No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्र क्रमांक)** |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्ता प्रकार)** | **Address (पत्ता)::** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपतप्रतिबंधक विभागसोलापुर, सोलापुर , सांगोला, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपतप्रतिबंधक विभागसोलापुर, सोलापुर , सांगोला, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती विजया महारूद्र नाईक | | | 1. Town/Village (शहर / गाव): इसबावी तापंढरपुर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सांगोला,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | वैभव पिराजी मोरे | | | 1. Town/Village (शहर / गाव): मुंढेवाडी,ता पंढरपुर,Tehsil (तहसील): ता पंढरपुर,Police Station (पोलीस ठाणे): सांगोला,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.06/03/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.05/03/2026 रोजी आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून तक्रारदार श्री विनोद सिताराम सातपुते, रा. मु.पो ओझेवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार कळविली असून त्याअनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही तात्काळ आमचेकडील अंमलदार मार्फत पंचायत समिती दक्षिण सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून 1) समर्थ सुरवसे, पद - कनिष्ठ अभियंता 2) प्रज्वल कुर्ले, पद - कनिष्ठ अभियंता हे दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेतले. त्यानंतर आम्ही सदर पंचांना पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांची व माझी ओळख सांगुन तक्रारदार श्री विनोद सिताराम सातपुते यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सांगोला येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार असलेबाबत त्यांची संमती घेतली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, पोकॉ/862 पवार, महिला पोकॉ/1772 गायकवाड व चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हॉईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अल्ट्रा व्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच 12 यु.सी 4098 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 11.45 वा शासकीय वाहनातून पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, पोकॉ/862 पवार, महिला पोकॉ/1772 गायकवाड व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे आणि पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांचेकडील खाजगी वाहन किया, रजि क्र. एम.एच 10. डी.एल 7804 यामधून पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले व आम्ही असे मिळून सांगोलाकडे रवाना झालो. आम्ही मंगळवेढामार्गे 13.00 वा चे सुमारास सांगोला शहराच्या अलीकडे सोलापूर-मिरज महामार्गावरील सांगोला शहरात जाणा-या बायपास रोडच्या अलीकडे पोहोचलो. दरम्यानच्या काळात पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी फोनवरून दिलेल्या सुचनेनुसार तक्रारदार सातपुते हे त्याठिकाणी येऊन थांबले होते. त्यानंतर आम्ही तक्रारदार सातपुते यांना पोलीस उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंच व आमची ओळख करून दिली. आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विनोद सिताराम सातपुते, वय 32 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. मु.पो. ओझेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर असे असल्याचे सांगुन त्यांनी त्यांचे आईचे नावे मौजे

धायटी, गट नं.537/2 याठिकाणी शेतजमीन खरेदी केले असून खरेदी दस्तावरून सातबारा उता-यावर त्यांच्या आईचे नाव लावण्यासाठी तलाठी कार्यालयात अर्ज दिला होता, सदर खरेदीवर श्रीमती मंगल पांडूरंग लवटे यांनी हरकत घेतल्याने त्याबाबत मंडल अधिकारी यांच्याकडे सुनावणी सुरू होती, सदर हरकतीचा निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावून तक्रारदार यांच्या आईचे नाव सातबारा उता-यावर लावण्यासाठी मंडल अधिकारी व त्यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे यांनी तक्रारदार यांच्या आईकडे 10000/- रू. रकमेची मागणी करीत असल्याचे तक्रार सांगुन त्यांची सविस्तर तक्रार स्वःहस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार सातपुते यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून समर्थ सुरवसे व पंच क्र.2 म्हणून प्रज्वल कुर्ले यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार सातपुते, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर व EVMकंपनीचे पॅकिंग मधील 08 जीबीचे EVM 8GB MICRO SD HCत्याच्या मागील बाजूस CEMM8GC10FSXB6D-243 240816 SM MAID IN TAIWAN EVMTF/8GB0824SE असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर आणखीन एक EVM कंपनीचे पॅकिंग मधील 08 जीबीचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढले, त्याचे वर्णन EVM 8GB MICRO SD HCत्याच्या मागील बाजूस CE MM8GC10FSXB6D-243 240816 SM MAID INTAIWAN EVM TF/8GB0824SE असे असून सदर मेमरीकार्ड ला.प्र.वि विभागाकडील सॅमसंग कंपनीचे शासकीय मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट करण्यात आले जेणेकरून निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करताना चित्रीकरणाचे फाईल मेमरीकार्डमध्ये जतन होईल. त्यानंतर तक्रारदार सातपुते व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 13.31 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोकॉ/766 किणगी यांनी केले. त्यानंतर तक्रारदार सातपुते यांना लोकसेविका नाईक व त्यांचे खाजगी चालक वैभव मोरे यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, लोकसेविका नाईक हे संगेवाडी गावातील मंडल अधिकारी कार्यालयात भेटू शकतील असे सांगितले.

त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हॉईस रेकॉर्डर 13.41 वा चालू करून तो तक्रारदार सातपुते यांचे शर्टाच्या आत असलेले बनियनच्या आतील बाजूस गळयात अडकावून तक्रारदार सातपुते व पंच क्र.1 सुरवसे यांना तक्रारदार सातपुते यांचे काळ्या रंगाचे होन्डा शाईन, रजि. क्र. एम.एच 13, डी.एच 2937 यावरून संगेवाडी गावातील मंडल अधिकारी कार्यालयाकडे रवाना करून पडताळणी केली. तक्रारदार सातपुते व पंच क्र.1 सुरवसे हे दोघे पडताळणीवरून पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले, ती वेळ 15.25 वा.ची होती. सदर पडताळणीदरम्यान तक्रारदार व मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे यांच्यामध्ये चर्चा झाली, त्यावेळी वैभव मोरे यांनी तक्रारदार यांच्याकडे मॅडमन 10

सांगितल्यात..लास्ट मॅडम म्हणत्यात 7 घ्या..ती पण तुमच्या आईची कामाला जातीय ही जातीय..आजी गरीब हाय म्हणून मीच सांगितल बरका मॅडमला असे बोलून श्रीमती नाईक यांच्यावतीने लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तक्रारदार हे मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांची भेट घेऊन कामाचे अनुषंगाने चर्चा करताना तक्रारदार यांनी आता ते झालय कस मॅडम

ते आता ते..वैभव आता ते असे म्हणाले, त्यावर श्रीमती नाईक यांनी असुद्या मी बोललेय त्यांच्यापाशी, मी काय डायरेक्ट बोलत नाय, मी सांगितलय त्यांच्यापाशी, सांगतो पुन्हा आम्ही अजून तुम्हाला असे म्हणून वैभव मोरे यांनी त्यांच्यावतीने केलेल्या लाच मागणीस दुजोरा दिला. त्यावर तक्रारदार यांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी नाय ती सगळया गोष्टी मला मान्य हायत्या, मुळात तुमची नोंदच करण मी चुकीची हाय ओ, तस सांगा कायच विषय नाही असे म्हणाले. त्यानंतर पुढे चर्चेवेळी श्रीमती नाईक यांनी माझ्यासमोर तुमच क्षेत्रच चुकीच आलय..तुमचा दस्तच चुकीचा झालाय..तरी सुध्दा मी तुमच करून देते म्हणून सांगतेय..मी जर ठरवल तर एका मिनीटात तुमची नोंद रद्द करून टाकते क्षेत्र चुकीच हाय म्हणून..करू शकते का नाय एवढ मला सांगा असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी तुमच सांगितल आम्ही आमच सांगतो की तुम्हाला असे बोलून लाच रक्कम मागणीस पुन्हा दुजोरा दिला. त्यानंतर पुन्हा श्रीमती नाईक यांनी आम्ही आमच सांगतो की तुम्हाला, तुम्ही बोलला तुमच मी ऐकुन घेतल की तुमच आता, बरोबर हाय का नाय असे बोलले. त्यानंतर त्यांनी पुन्हा आता तुम्ही बोललय ना वैभवपशी, बोललेत, वैभव बोलतय माझ्याशी असे म्हणून त्यांचे खाजगी चालक यांच्याशी केलेल्या चर्चेबद्दल विचारणा केली. त्यावर तक्रारदार यांनी दोन मिनीट ऐका की असे बोलले असता श्रीमती नाईक यांनी नको प्रत्यक्ष असे बोलून त्यांनी स्वत: स्पष्टपणे लाचेच्या रकमेबाबत चर्चा करण्यास नकार देऊन त्यांचे चालक वैभव मोरे यांच्याशी बोलण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रकमेमध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता श्रीमती नाईक यांनी बघु बोलू आपण, काय गडबड नाय, बोलू, एवढ होऊदे आमची संघटनेची मिटींग आहे..मला जायच हाय तीन वाजता असे म्हणाले. सदर चर्चेवरून श्रीमती नाईक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे यांच्या मार्फतीने रू 7000/- ची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. सदर पडताळणीमध्ये करण्यात आलेल्या कारवाईचे सविस्तर वर्णन पडताळणी व यशस्वी सापळा पंचनाम्यामध्ये करण्यात आले आहे.

पडताळणी कारवाईदरम्यान लोकसेविका मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांचे चालक वैभव मोरे यांच्याकडून लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्याने आम्ही पोलीस अंमलदार पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, पोकॉ/862 पवार, महिला पोकॉ/1772 गायकवाड व चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना शासकीय वाहनाजवळ बोलावून घेतले आणि सर्व अंमलदारांची तक्रारदार सातपुते यांच्यासह ओळख करून दिली आणि तक्रारदार सातपुते यांची तक्रार व त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईबाबत माहिती दिली. यादरम्यान लोकसेविका श्रीमती नाईक यांचे खाजगी वाहन चालक वैभव मोरे यांचे तक्रारदार यांच्याशी वेळोवेळी मोबाईलवरून संपर्क होऊन ते तहसील कार्यालय सांगोला येथे असल्याने त्याठिकाणी भेटण्यास बोलावले. त्यानंतर आम्ही मंडल अधिकारी श्रीमती नाईक व त्यांचे खाजगी चालक वैभव मोरे यांच्याविरूध्द सांगोला तहसील कार्यालय येथे सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर सापळापुर्व कारवाईदरम्यान तक्रारदार सातपुते यांनी 500/- रू दराचे 14 चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे क्रमांक महिला पोकॉ/1772 गायकवाड यांनी एका कागदावर लिहिले. त्यांची खात्री करून आम्ही व दोन्ही पंचांनी त्यावर सह्या केल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना अँन्थ्रीसीन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवून त्याचे गुणधर्म आणि त्यांचा वापराबाबत माहिती दिली. त्यानंतर आमच्या सुचनेवरून चालक पोकॉ/2026 श्रीराम यांनी सदर नोटा एका कागदावर पसरवून कापसाच्या बोळ्याने नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रीसीन पावडर

लावले त्यानंतर सदर नोटा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवले.
त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने 16.39 वा. चे सुमारास तक्रारदार सातपुते व दोन्ही पंचाचे निवेदने व्हॉईसरेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोकॉ/766 किणगी यांनी त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले . त्यानंतर आम्ही व पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी तक्रारदार सातपुते व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सर्व आवश्यक सुचना दिल्या आणि तक्रारदार सातपुते यांना वैभव मोरे यांनी लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर त्यांचे डावा हात त्यांच्या डोक्यावरून फिरवून इशारा देण्याच्या सुचना दिल्या. सापळा कारवाई यशस्वी झाल्यास अंगझडती व लाचेची रक्कम जप्त करण्याच्या कारवाईवेळी व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबत पोकॉ/766 किणगी यांना सुचना देऊन सॅमसंग कंपनीचे शासकीय मोबाईल पोकॉ/766 किणगी यांच्या ताब्यात दिले.

त्यानंतर लोकसेविका श्रीमती नाईक व त्यांचे खाजगी वाहन चालक वैभव मोरे यांच्यावर सापळा कारवाई करण्यासाठी व्हॉईस रेकॉर्डर 16.48 वा. चालू करुन ते तक्रारदार सातपुते यांच्या शर्टाच्या आत बनियनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 सुरवसे यांच्यासह तक्रारदार यांचेकडील मोटारसायकलवर रवाना केले. त्यांच्या पाठीमागे पोउपअधी श्री चौगुले यांचे खाजगी वाहनातून श्री चौगुले, पोकॉ/766 किणगी, पोकॉ/862 पवार आणि शासकीय वाहनातून आम्ही, पंच क्र.2
कुर्ले, पोना/30 नरोटे, महिला पोकॉ/1772 गायकवाड व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे दोन्ही वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र.1 दोघे सांगोला तहसील कार्यालयाजवळ गेल्यानंतर कार्यालयाच्या बाहेरील बाजूस मोटार सायकल लावून तहसील कार्यालयाच्या समोर असलेल्या उसाच्या रसाच्या दुकानाजवळ थांबले. त्यावेळी आम्ही दोन्ही वाहनातून उतरून तहसील कार्यालयाच्या समोरील बाजूस आणि उसाच्या रसाच्या दुकानाच्या बाजूस सापळा लावून थांबलो. यादरम्यान चालक पोकॉ/2026 श्रीराम हे आमच्या सुचनेवरून शासकीय वाहनात थांबून होते. यादरम्यान तक्रारदार सातपुते यांनी त्यांचे मोबाईलवरून बोलताना दिसून आले. काहीवेळाने एक इसम तक्रारदार व पंच क्र.1 यांच्याजवळ येऊन बोलत थांबले. त्यानंतर ते आम्ही सापळा लावून थांबलेल्या उसाच्या रसाच्या दुकानासमोर येऊन त्याठिकाणी ठेवलेल्या खुर्च्यावर बसून चर्चा करत बसले. यावरून सदर इसम हे लोकसेविका मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांचे खाजगी चालक वैभव मोरे असल्याचे आम्हास पंचाने होकारात्मक मान करून इशारा केल्याने समजले. यादरम्यान तक्रारदार सातपुते यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवलेले लाच रक्कम उजव्या हाताने काढून वैभव मोरे यांच्यासमोर धरले असता त्यांनी सदर नोटा त्यांच्या उजव्या हाताने स्वीकारून त्यांनी नेसलेल्या शर्टाच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवले. उसाच्या रसाच्या दुकानासमोरच आम्ही सापळा लावून थांबलेलो असल्याने सदर घटना आम्ही स्पष्टपणे पाहिले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा इशारा दिला. त्यावर आम्ही त्याठिकाणी जावून वैभव मोरे यांना ताब्यात घेतला. यावेळी आम्ही वैभम मोरे यांचा उजवा हात पकडून ठेवला. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री चौगुले व आम्ही वैभव मोरे यांना आमची ओळख सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली. त्यानंतर आमच्या सुचनेवरून पोकॉ/766 किणगी यांनी शासकीय मोबाईलमधून सदर घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डींग सुरू केले. त्यानंतर आम्ही वैभव मोरे यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी

त्यांचे नाव वैभव पिराजी मोरे, वय 28 वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हर, रा. मुंढेवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर असे सांगितले. त्यानंतर आम्ही वैभव मोरे यास तक्रारदार व दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील अंमलदारांची थोडक्यात ओळख करून देऊन त्यांच्यावर झालेल्या कारवाईची माहिती दिली आणि त्यांना तक्रारदार सातपुते यांच्याकडून स्वीकारलेली रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी सांगण्यास टाळाटाळ केली, त्यानंतर आम्ही पंच क्र.1 सुरवसे यांना विचारले असता, वैभव मोरे यांनी लाचेची रक्कम स्वीकारून त्यांचे शर्टाच्या समोरील डाव्या बाजूस असलेल्या खिशामध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पुन्हा वैभव मोरे यांना लाच रकमेबाबत विचारून सदर रक्कम काढून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांच्या शर्टाच्या खिशातील लाच रक्कम काढून दिले. त्यावेळी आमच्या सुचनेवरून पंच क्र.2 कुर्ले यांनी सदर रक्कम ताब्यात घेतले. त्यानंतर सदर नोटांचे क्रमांकाची पंच नं.2 कुर्ले यांचे करवी यापुर्वी नोटांचे क्रमांक लिहून ठेवलेल्या क्रमांकाशी पडताळणी केली असता त्या तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळून आल्या. त्यानंतर रसवंती गृहात एका कोप-यात आम्ही सर्वजण एकत्रित उभारून कृत्रिम अंधार करुन अंधारात वैभव मोरे यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर वैभव मोरे यांच्या उजव्या हाताची व त्यांचे शर्टाचे समोरील डाव्या बाजूच्या खिशाची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता त्याठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर आमच्या सुचनेवरून पोकॉ/766 किणगी यांनी व्हिडीओ चित्रीकरण बंद केला.यादरम्यान पोना/30 नरोटे यांनी तक्रारदार यांच्या गळ्यातील व्हॉईसरेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. ती वेळ 17.02 वा. ची होती. त्यानंतर आम्ही महिला पोकॉ/1772 गायकवाड यांच्या साहायाने 17.30 वा. मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांना तहसील कार्यालय सांगोला समोरील परिसरातून ताब्यात घेऊन सांगोला येथील विश्रामगृहात आलो.

सांगोला येथील शासकीय विश्रामगृह येथे आल्यानंतर आम्ही पंच क्र.1 सुरवसे व तक्रारदार सातपुते यांना सापळा कारवाईवेळी झालेल्या घटनेचे हकिकत विचारून घेतले आणि व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून त्याची खात्री केली. त्यानंतर विश्रामगृह येथे संभाषणाचा उतारा काढण्यात आल्यानंतर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आले असून पडताळणी, सापळापुर्व आणि सापळा कारवाईवेळी घडलेल्या घटनेचे सविस्तर वर्णन पंचनाम्यामध्ये करण्यात आले आहे.

तरी दि.05.03.2026 रोजी तक्रारदार श्री. विनोद सिताराम सातपुते यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.05.03.2026 रोजी 13.41 वा. पासून 17.02 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान संगेवाडी मंडल अधिकारी कार्यालय येथे श्रीमती विजया महारूद्र नाईक, यांचे खाजगी वाहन चालक श्री वैभव पिराजी मोरे यांनी तक्रारदार श्री विनोद सिताराम सातपुते यांच्या आईचे नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीच्या खरेदी दस्तावर प्राप्त हरकतीचे निकाल तक्रारदार यांच्या बाजुने लावून तक्रारदार यांच्या आईचे नावे केलेल्या खरेदीची नोंद ग्राह्य धरून त्यांचे नाव सातबारा उता-यावर लावण्यासाठी मंडल अधिकारी श्रीमती विजया महारूद्र नाईक यांच्यावतीने 10,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 7000/- रू. मागणी केली. श्री वैभव पिराजी मोरे यांनी मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांच्यावतीने केलेल्या लाच मागणीबाबत तक्रारदार सातपुते

यांना मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांच्याकडे पाठवून पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी त्यांचे खाजगी वाहनाचे चालक वैभव मोरे यांच्या मार्फतीने केलेल्या लाच मागणीस दुजोरा देऊन असुद्या मी बोललेय त्यांच्यापाशी, मी काय डायरेक्ट बोलत नाय, मी सांगितलय त्यांच्यापाशी, सांगतो पुन्हा आम्ही अजून तुम्हाला असे म्हणून सदर अपराधास अपप्रेरणा दिली. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान मंडल अधिकारी श्रीमती नाईक यांचे खाजगी वाहनाचे चालक श्री वैभव मोरे यांनी तक्रारदार सातपुते यांच्याकडून 7000/- रू लाचेची रक्कम स्वत: स्वीकारले. म्हणून श्रीमती विजया महारूद्र नाईक, वय - 45 वर्षे, पद - मंडल अधिकारी, नेम - सांगोला तहसिल कार्यालय व त्यांचे खाजगी वाहनाचे चालक श्री वैभव पिराजी मोरे, वय - 28 वर्षे, व्यवसाय - ड्रायव्हर, रा. मु.पो मुंढेवाडी, ता. पंढरपुर, जि. सोलापूर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7-अ व 12 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

ठाणे अंमलदार
सांगोला पोलीस ठाणे

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Vinod Prabhu Ghuge (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vinod Prabhu Ghuge

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | 1981 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1998 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)